माहितीचा
अधिकार

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक ०५/२०१८

दिनेश गंगाराम सोमाणी,
रा.गीतगंगा भुतबंगला, शेगाव,
ता.शेगाव, जि.बुलडाणा

अर्जदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
बांधकाम अभियंता, नगर परिषद कार्यालय शेगाव,
ता.शेगाव, जि.बुलडाणा

उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय शेगाव,
ता.शेगाव, जि.बुलडाणा

| **उपस्थिती**: सुनावणी दिनांक **१२.०५.२०२२** | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| प्र.अ.अ. | प्रतिनिधी (प्राधिकृत पत्र दि.१२.०५.२०२२) | श्री.एस.एस.बोबडे, सहा.पर्यवेक्षक |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.
अर्जदार गैरहजर

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा
दिनांकः १२ मे २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगानी चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांक: | १८.०४.२०१७ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांक: | २४.०५.२०१७ |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांक: | १६.१०.२०१७ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांक: | ०७.११.२०१७ |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांक: | ०७.१२.२०१७ / ०१.०१.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशापासून दिवस: | ५५ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांक: | २९.०४.२०२२ |

२. प्रस्तुत अपिल क्र.०५/२०१८ मध्ये यापुर्वी झालेला दि.१९ एप्रिल २०२२ रोजीचा आदेश वाचावे.

३. प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी दि.१९ एप्रिल २०२२ रोजी झालेल्या आदेशात पुढीलप्रमाणे विवेचन करण्यात आले होते.

> " आयोगाचे दि.११.०१.२०२२ रोजीच्या आदेशातील अनु.क्र.१५ वर मागितलेली माहिती अपुर्ण व उशिरा देण्याबाबत मुख्याधिकारी यांना जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले होते. मुख्याधिकारी नगर परिषद शेगाव यांचे दि.०८.०३.२०२२ रोजीच्या खुलाश्यात काय चौकशी करण्यात आली व त्यांनी कोणत्या अभिलेखावरुन ते विजयकुमार आश्रमा यांचे पडताळणी करण्याचा प्रयत्न केला याचा बोध होत नाही, त्यात आवक जावक विभागाकडुन अर्ज मिळाल्यास उशिर झाला याबाबत काही पडताळणी केल्याचे दिसुन येत नाही. मुख्याधिकारी नगर परिषद शेगाव यांचेकडुन वस्तुनिष्ठ अहवाल अपेक्षित आहे. जर विजयकुमार आश्रमा यांना आवक कक्षांनी दि.३०.०४.२०१७ रोजी माहितीचा अर्ज दिला व दि.३१.०५.२०१७ रोजी त्यांची बदली इतरत्र झाली तसेच त्या कालावधीत दि.०६.०५.२०१७ ते १५.०५.२०१७ पर्यत वैद्यकिय कारणाने रजेवर होते तर त्यांचेकडुन अर्ज खरोखरच दुर्लक्षित झाल्याचे ठरविणे उचित राहील काय, याबाबत विवेचन मुख्याधिकारी यांचेकडुन अपेक्षित आहे."

४. दि.१९ एप्रिल २०२२ रोजी झालेल्या आदेशात वरीलप्रमाणे विवेचन नमुद करुन, पुढीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.